शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१

# इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२२-२३

(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांसाठी)

## अखेरची प्रवेश फेरी

सन.२०२२-२३ इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत आता पर्यंत तीन नियमित फेऱ्या, तीन विशेष फेऱ्या तसेच दि.२६/०९/२०२२ पासून दि.२१/१०/२०२२ अखेर (दैनंदिन गुणवत्ता DMR) सतत विशेष फेऱ्यांचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्रथम सत्र समाप्त झाले असून द्वितीय सत्र सुरु झालेले आहे. तरीही आणखी काही विद्यार्थी इ.११वी प्रवेशासाठी क्षेत्रीय कार्यालयं तसेच संचालनालय येथे येऊन प्रवेशासाठी विनंती करत आहेत. प्रवेशासाठी विलंब होणेची कारणे तपासली असता त्यामध्ये, अन्य अभ्यासक्रमांना प्रवेशासाठी संधी न मिळाल्याने इ.११वी मध्ये प्रवेश घेणे, अन्य ठिकाणी प्रवेश रद्द केलेने तसेच स्थलांतर व इतर वैयक्तिक कारणे निदर्शनास येत आहेत. अशा विद्यार्थ्यांना प्रवेशाची अखेरची संधी मिळावी, प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असणे ही वस्तुस्थिती आहे. इ.११वी राज्यस्तर प्रवेश नियंत्रण समिती समोर या बाबींवर चर्चा करण्यात आली आणि अशा विद्यार्थ्यांना प्रवेशाची एक अतिरिक्त संधी देणेबाबत सदस्यांचे एकमत झाले, त्यानुसार पुढीलप्रमाणे सन.२०२२-२३ मधील अंतिम प्रवेश फेरीचे आयोजन करण्यात येत आहे.

- **२०२२-२३ इ.११वी मध्ये प्रवेशासाठी ही अखेरची संधी असेल. त्याअंतर्गत कार्यवाहीचे टप्पे पुढीलप्रमाणे असतील.**
- **दि.१५ व १६ नोव्हेंबर, २०२२ रोजी दैनंदिन गुणवत्ता फेरी अर्थात DMR विशेष फेऱ्यांचे आयोजन करण्यात येईल.**
- **दि.१७ व १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी शिक्षण उपसंचालक स्तरावरुन अलॉटमेंट करण्यात येईल.**
- **अलॉटमेंट मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी एक दिवस मिळेल, दि.१९/११/२०२२ पर्यंत प्रवेश घेता येतील.**
- **प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी Admission Cancellation दि.१४/११/२०२२ पासून दि.१५/११/२०२२ पर्यंत सुरु राहील.**
- **नवीन Student Registration & Verification दि.१२/११/२०२२ पासून दि.१५/११/२०२२ पर्यंत सुरु राहील.**

**(अखेरची विशेष फेरी)**

| वार | दिनांक | दैनिक फेरीसाठी अर्ज करणे | विद्यार्थ्यांसाठी प्रवेशासाठी वेळ | विद्यालयांसाठी अतिरिक्त वेळ | उद्यासाठी DMR अर्ज करणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| शनिवार | १२/११/२०२२ | * | * | * | * | प्रवेश रद्द करणे तसेच नवीन नोंदणी |
| रविवार | १३/११/२०२२ | * | * | * | * | |
| सोमवार | १४/११/२०२२ | * | * | * | सुरु | |
| मंगळवार | १५/११/२०२२ | स.०८वा पर्यंत | स.१० ते सायं.०५ | सायं.०६वा पर्यंत | सायं.०७वा पासून | |
| बुधवार | १६/११/२०२२ | स.०८वा पर्यंत | स.१० ते सायं.०५ | सायं.०६वा पर्यंत | सायं.०७वा पासून | DMR Ends |
| गुरुवार | १७/११/२०२२ | | स.१० ते सायं.०५ | सायं.०६वा पर्यंत | * | Allotment by DyDE |
| शुक्रवार | १८/११/२०२२ | | स.१० ते सायं.०५ | सायं.०६वा पर्यंत | * | |
| शनिवार | १९/११/२०२२ | | स.१० ते सायं.०५ | सायं.०६वा पर्यंत | बंद | * |

- प्रवेश अर्जाचा भाग-१ भरुन प्रमाणित असलेल्या विद्यार्थ्यांना भाग-२ पसंती देऊन DMR फेरीमध्ये सहभागी होता येईल.
- शिक्षण उपसंचालक स्तरावरुन अलॉटमेंट साठी विद्यार्थ्यांनी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक (DyDE) कार्यालयात जाऊन विनंती अर्ज देणे आवश्यक आहे, शिक्षण उपसंचालक स्तरावरुन विद्यार्थ्यांची पसंती व रिक्त जागा तपासून अलॉटमेंट देण्यात येईल, अलॉटमेंट मिळाल्यानंतर दुसऱ्या दिवस अखेरपर्यंत विद्यार्थ्याने संबंधित विद्यालयात आपला प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. अन्यथा अलॉटमेंट रद्द हाईल.
- यानंतर नवीन प्रवेश होणार नाहीत तथापि प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी Transfer सुविधा Online उपलब्ध होऊ शकेल.

टीप- अधिक माहितीसाठी संबंधित शिक्षण उपसंचालक कार्यालय अथवा कॉल सेंटरशी संपर्क साधता येईल.

पुणे, दिनांक-११/११/२०२२

11/11/2022

(कृष्णकुमार पाटील)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)